# महाराष्ट्रातील स्त्री-जीवनातील विचार जागृती

## प्रारंभापासूनची उपेक्षा

स्त्रियांच्या गुलामगिरीचा, उपेक्षेचा विचार करता, (त्यांचे प्रारंभीचे म्हणजे वेदकालातील जीवन तसे पाहता अगदीच निकृष्ठ प्रतिचें होतें असे म्हणता येणार नाही) वेदकाळात म्हणजे कृषिवलावस्थेत (रानटी अवस्थेत) स्त्रियांना मानाचे स्थान होते. पुरुषांच्या बरोबरीने अधिकार दिले जात होते. वेदाध्ययन करण्याचे स्वातंत्र्य तत्कालिन समाजाने त्यांना बहाल केले होते. रामायण–महाभारतातील स्त्रियांना तर राजदरबारात, सभा समारंभात बसण्याचा मान होता. एवढेच नव्हे तर राज्याभिषेकामध्ये त्या हस्तक्षेप करू शकत होत्या. रामाला वनवास भोगावयाला लावला तो कैकयीने दशरथाच्या अधिकारात हस्तक्षेप करूनच. (याचाच अर्थ तत्कालीन समाजात मातृसत्ताक कुटुंबपद्धती अस्तित्वात होती, हे सर्वमान्य आहे.)

परंतु त्यानंतर म्हणजे स्मृतिकालापासून स्त्रियांच्या उपेक्षेला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. ती जवळजवळ एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत (आजही स्त्रियांची उन्नती हवी तशी झालेली दिसत नाही. त्या पूर्णपणे गुलामगिरीतून, दास्यातून मुक्त झाल्या आहेत असे म्हणता येणार नाही. शहरी जीवनातील थोडयाफार सुशिक्षीत, सुसंस्कृत स्त्रिया सोडल्या तर ग्रामीण भागातील, खेडयातील, डोंगर कपारीत राहणाऱ्या बहुसंख्य स्त्रिया अज्ञानाच्या अंधःकारात तशाच गुरफटून पडलेल्या पहावयास मिळतात.) स्मृतिकाळात स्त्री–मनावर अनेकविध गोष्टींचे दडपण घालण्यात आले. पतिव्रता धर्म किंवा स्त्री म्हणजे पायाची दासी गरिब गाय, तिने नेहमी खाली मान घालूनच चालले पाहिजे इ० गोष्टी आज स्वातंत्र्य मिळून चौतीस वर्षे झाली तरी तसुभरही त्यांच्या अंतःकरणातून बाजूला होऊ शकत नाहीत. स्त्रियांच्यावर खरा अत्याचार, अन्याय अवहेलना झाली ती स्मृतिकाळातच. बुद्ध काळात त्यांना थोडेफार आदराचे स्थान होते. कारण त्या काळात स्त्रियांनी शिक्षण घेतल्यामुळे कांही लेखन केल्याची उदाहरणे सापडतात. नंतर महानुभाव पंथ वारकरी संप्रदाय या कालखंडातील विचारवंतांना तत्कालीन स्त्रियांची दुःखे, त्यांच्यावरील अत्याचार जाणवले म्हणून त्यांनी काही प्रमाणात स्त्रियांच्या गुलामगिरीविषयक आपले विचार मांडलेले पहावयास मिळतात.

स्त्रियांना दास्यातून मुक्त करण्यासाठी प्रकर्षाने विचार मांडले गेले ते एकोणिसाव्या शतकापासून. या शतकामध्ये सती जाणे, विधवा विवाहास प्रतिबंध, बालविवाह इ. रुढींना बहरच आला होता, स्त्रियांना पतिच्या चितेवर जिवंत जाळले जात होते. विधवांना न्हाव्यापुढे बसून आपल्या सुंदर केसाचे वपन करावे लागत असे. या सर्व व्यथांना वाचा फोडली ती राजाराम मोहन रॉय, लोकहितवादी म. फुले, आगरकर, म. वि. रा. शिंदे इ. समाजोद्धारकानी मन्रो, बेंटिंग सारख्या ब्रिटिश कार्यकर्त्यांनी देखील स्त्रियांची बाजू मांडली ती याच कालखंडात. (आजही स्त्री जीवनातील समस्याचा विचार आवेशपूर्ण होत आहे. तरी देखील स्त्रिया पूर्णपणे स्वतंत्र झाल्या आहेत असे म्हणता येणार नाही. स्त्रियांची उपेक्षा आजही चालूच आहे. ग्रामीण जीवनातील आजही गुलामगिरीचीच प्रतिनिधी बनलेली पहावयास मिळते.)

## अवलंबाची दुःखे :–

अवलंबाच्या दुःखाचा ऐतिहासिक आढावा

वेदकाळ, रामायण–महाभारतातील स्त्रीला प्रतिष्ठा होती, स्वतंत्र अस्तित्व होते, समानतेची वागणूक मिळत होती हे सत्य आहे. परंतु स्मृतिकाळात या सर्व गोष्टी

ती हिराबून बसली. हे ही सत्यच मानावे लागेल. परंपरागत अनिष्ट चालिमुळे संस्कृतीतील धर्म ग्रंथातील जाचक बंधनांमुळे ती समाजाच्या विशिष्ट चाकोरीबाहेर जाऊच शकली नाही. 'मनुस्मृती' सारख्या ग्रंथातील भ्रामक कल्पनांनी त्यांची मने भारावून गेली (यामुळेच पतिव्रता धर्मातील विचारांपासून त्या आजही वचित राहू शकत नाहीत.) धर्माच्या नावाखाली त्यांना जिवंत जाळण्यात येत होते. तत्कालीन समाजात सतीची चाल रुढ असल्यामुळे आणि बालविवाहाची पद्धत चालू असल्याने बालवयातच विधवा झालेल्या स्त्रीला पतिच्या चितेवर तिच्या इच्छेविरुद्ध जाळून घ्यावे लागत असे. विधवा स्त्रीचे न्हाव्याकडून केशवपन करून घेत असत. एखादी स्त्री विधवा झाली आणि ती केस कापण्यापूर्वीच मरण पावली तर तिचे केस कापून तिला अग्नि देत असत. बालविवाहामुळे कित्येक स्त्रियांना बालपणापासूनच विधवापणाची दुःखे भोगावी लागत असत. विधवांचे तोंड न पाहणे, शुभ कार्यामध्ये त्यांना अशुभ मानणे इ. गोष्टी समाज काटेकोरपणे पाळत होता. एवढेच नव्हे तर त्यांना जनावराप्रमाणे वागविले जात होते. त्यांच्याकडून १७–१८ तास काम करून घेतले जात असे. एकोणिसाव्या शतकापर्यंत त्यांना कुत्र्या–मांजरा पलिकडे वागविले जात होते.

## विचार जागृतीचे प्रणेते

प्राचीन काळातील स्त्री अज्ञानी होती. सुसंस्कृत जीवनापासून ती पूर्णपणे वंचित राहिली होती. सुधारिक पद्धतीच्या शिक्षणाचा तिला गंधही नव्हता. प्राचीन स्त्री आणि आजची स्त्री यामध्ये मोठ्या प्रमाणात फरक जाणवतो. आजची स्त्री थोडीफार सुशिक्षित, सुसंस्कृत झाली आहे. पण तिच्या पाठीमागे वरीचशी तपश्चर्या घडवावी लागली आहे. तिच्या उध्दारासाठी कित्येक समाजोध्दारकांनी आपले जीवन वाहिले आहे. विविध संस्था राबविल्या गेल्या आहेत. विविध चळवळीं कराव्या लागल्या आहेत. वृत्तपत्र नियतकालिकांनी स्त्रियांच्या वेदना घरोघरीं पोहचविल्या आहेत. म्हणूनच आज स्त्री–मुक्तीला लढ्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

ख्रिस्ती मिशनरी हे स्त्री जीवनात क्रांती घडवून आणणारे पहिले कैवारी होत. ब्रिटीश राजवट व्यवस्थितपणे सुरु झाल्यानंतर त्यांनी धर्मप्रचार व प्रसार हा उद्देश मनात ठेवून उपेक्षित स्त्री वर्गाचा उद्धार करण्याकडे लक्ष पुरविले, यासाठी स्त्रियांना प्रथम शिक्षण देऊन त्यांचे अज्ञान दूर केले पाहिजे हे त्यांनी ओळखले आणि तसे प्रयत्नही केले- सन १८२४ व १८२८ साली अनुक्रमे 'अमेरिकन मराठी मिशन' व 'चर्च मिशन सोसायटी' यांची स्थापना करून स्त्री-शिक्षणाचा पाया घातला. तसेच मिसेस वुईलसन यांनी १८२९ मध्ये मुंबईत स्त्री–शिक्षणासाठी सहा शाळा काढल्या. फारशी, मराठी, गुजराथी व अन्य जातीच्या मुलींना या शाळांमधून शिक्षण घेता येत असे. मिशनऱ्यांचा हेतू धर्म प्रचार व प्रसार असला तरी स्त्री-शिक्षणाचे पहिले कैवारी तेच ठरतात हे मान्य करावे लागेल.

या नंतर स्त्री मनामध्ये विचार जागृती केली ती लोकहितवादी, मेरी कार्पेन्टर, म. फुले, आगरकर म. कर्वे इ० थोर, समाज सुधारकांनी लोकहितवादींनी आपल्या शतपत्रामध्ये स्त्री–विषयक विचार परखडपणे मांडले आहेत. विधवांची दु.खे त्यांनी प्रत्यक्ष पाहिली होती. 'सती' सारख्या अनिष्ट चाली त्याकाळी अस्त्विात होत्या. बालविधवांच्या करुण कहाण्या त्यांनी ऐकल्या होत्या. म्हणूनच समाजातील या अनिष्ट चाली त्यांना मोडून काढावयाच्या होत्या. या चालींना धर्मशास्त्रांत आधार नाही. हे त्यांनी स्पष्ट सांगितले आहे. लोकहितवादींनी ज्या सामाजिक सुधारणांचा पुरस्कार केला त्यामध्ये प्रामुख्याने बालविवाहास प्रतिबध, विधवा पुनर्विवाह, ब्राम्हणातील अंतरगोत्र विवाह इ. सुधारणांचा समावेश आहे. मेरी कार्पेंटर या इंग्लंडमधील बाईने देखील हिंदुस्थानातील स्त्रियांची बाजू उचलून धरली. हिंदुस्थानातील समाज सुधारकांच्या भेटी घेऊन त्यांनी स्त्रियांची स्थिती समजावून घेतली आणि 'स्त्री' सारख्या उपेक्षित वर्गाच्या सुधारणेमध्ये जातीने लक्ष घालून प्रत्यक्ष कार्य केले. त्या स्त्री-कामगारांसाठी रविवारी खास वर्ग सुरू केले. राजाराम मोहन रॉयनी तर सतीची चाल व बालविवाह बंद करण्याविषयीचे कायदेच करून घेतले. म. फुल्यांना स्त्री-शिक्षणाचा

( पान ३३ वर चालू )